पुढारी

# 'हवामान बदलांमुळेच पर्जन्यमानात वाढ'

कोल्हापूरः पुढारी वृत्तसेवा

हवामान बदलाचा परिणाम म्हणून पंचगंगा खोऱ्यात साळवण व इचलकरंजी या ठिकाणी २०१९मध्ये क्षमतेपेक्षा जास्तपावसाची नोंद झाल्यामुळे पूरस्थिती निर्माण झाली. त्यामुळे पर्जन्याचे स्वरूप, त्याची तीव्रता, कालावधी, प्रवणक्षेत्र यांचा अभ्यास करणे महत्त्वपूर्ण आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या 'सेंटर फॉर क्लायमेंट चेंज व सस्टेनॅबिलिटी स्टडीज'चे समन्वयक डॉ. सचिन पन्हाळकर यांनी केले.

'हवामान बदल व शाश्वत विकास' या ऑनलाईन व्याख्यानमालेत 'पंचगंगा महापूर : कारणे व उपाय' या विषयावर ते बोलत होते. पर्यावरणशास्त्र अधिविभागाचे माजी प्रमुख डॉ. पी. डी. राऊत अध्यक्षस्थानी होते.

डॉ. पन्हाळकर म्हणाले, अचूक पर्जन्य माहितीच्या आधारे रन ऑफ मॉडेल, फ्लड मॉडेल अशा नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून महापुराची तीव्रता कमी केली जाऊ शकते. पंचगंगा खोऱ्यात आलेल्या २००५ व २०१९ च्या पुरांचे तुलनात्मक विश्लेषण केले असता २०१९ च्या पुराची तीव्रता अधिक असल्याचे अभ्यासाअंती स्पष्ट झाले.

पंचगंगा खोऱ्यातील केवळ १२ टक्के क्षेत्र धरण पाणलोटाचे असून इतर भागातून येणाऱ्या पाण्यावर आपण नियंत्रण करू शकत नाही. त्यामुळे पूर स्थिती येते. ही समस्या दूर करण्यासाठी कॅसकेड धरणांची शृंखला निर्माण करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. लाल, निळ्या पूररेषांची पूरप्रवणता निर्माण करण्यामधील भूमिका मांडली. प्रतिमांच्या साह्याने २००४ व २०२१ मधील पंचगंगा नदी किनारी झालेली विकासकामे, अनधिकृत बांधकामे दर्शविली व त्यांना प्रतिबंध करणे आवश्यक असल्याचे सांगितले. अभिजित पाटील यांनी आभार मानले.

15 OCT 2021

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महाविद्यालये, अधिविभाग कॅम्पस् गजबजणार!

## विद्यापीठाकडून तयारी सुरू; लसीकरणाबाबत प्राचार्यांची बैठक

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शाळांपाठोपाठ आता महाविद्यालये २० ऑक्टोबरपासून सुरू करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यापार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठाकडून अधिविभाग व संलग्नित महाविद्यालये सुरू करण्याच्या तयारीस वेग आला आहे. कमी कोरोना प्रादुर्भाव व लसीकरण झालेली शंभर टक्के तर कोरोना संसर्ग असलेली महाविद्यालये ५० टक्के क्षमतेने सुरू केली जाणार आहेत. यामुळे दीड वर्षानंतर पुन्हा कॉलेज, अधिविभाग परिसर विद्यार्थ्यांमुळे गजबजणार आहे.

विद्यापीठे व महाविद्यालयांचे वर्ग सुरू करण्यास उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी परवानगी दिली आहे. विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी लसीकरण विशेष मोहीम, महाविद्यालयें सुरू करताना स्थानिक प्राधिकरणाशी विचारविनीमय, वसतिगृह टप्प्याटप्प्याने सुरू करताना आढावा घेण्याच्या सूचना शिक्षण विभागाने दिल्या आहेत. विद्यापीठ कार्यक्षेत्रात २७६ महाविद्यालये असून २ लाख ५० हजार विद्यार्थी संख्या आहे. महाविद्यालये, अधिविभाग सुरू करण्याच्या अनुषंगाने विद्यापीठाने तयारी सुरू केली आहे. सांगली, सातारा व कोल्हापूरच्या जिल्हाधिकाऱ्यांशी पत्रव्यवहार केला आहे. त्यांच्या परवानगीनंतर पुढील कार्यवाही होणार आहे.

> “ राज्य सरकारने महाविद्यालये, अधिविभाग सुरू करण्याचे निर्देश दिले आहेत. त्याअनुषंगाने अधिकार मंडळाची मान्यता घेतली जाईल. मार्गदर्शक सूचनांचे तंतोतंत पालन करण्याच्या सूचना महाविद्यालये, अधिविभागांना दिल्या आहेत. महाविद्यालये आणि विद्यार्थ्यांची गैरसोय होणार नाही, अशा पद्धतीने टप्प्याटप्प्याने महाविद्यालये सुरू केली जातील. जिल्हा प्रशासनाच्या सहकार्याने महाविद्यालय पातळीवर लसीकरण मोहीम राबविण्याचे नियोजन केले जाईल.
>
> **- डॉ. डी. टी. शिर्के, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ**

विद्यापीठातील अधिविभाग सुरू करण्यापूर्वी विद्यार्थी, विद्यार्थिनी वसतिगृहाची स्वच्छता, सॅनिटायजेशन सुरू झाले आहे. वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ७ हजारांहून अधिक आहे. मुली व मुलांचे १ ते ३ वसतिगृह जिल्हा प्रशासनाने विद्यापीठाच्या ताब्यात दिली आहेत. त्यांची स्वच्छता केली जात आहे. अधिविभाग सुरू झाल्यावर कमी क्षमतेवर वसतिगृह सुरू केली जाणार आहेत. एम.फिल., पीएच.डी.च्या विद्यार्थ्यांची वसतिगृह सुरू झाली आहेत. तंत्रज्ञान अधिविभागातील वसतिगृह अद्याप जिल्हा प्रशासनाने ताब्यात दिलेली नाहीत, अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली. मागील आठवड्यात विद्यापीठ परिसरात लसीकरण कॅम्प झाला आहे. शहरातील महाविद्यालयांतील विद्यार्थी, शिक्षक, कर्मचाऱ्यांचे लसीकरणासंदर्भात शनिवार (दि. १६) रोजी महापालिका उपायुक्त यांनी बैठक बोलावली आहे. संलग्नित महाविद्यालय लसीकरणाबाबत जिल्हा प्रशासनाशी संवाद साधला जाणार आहे. दोन लस घेतलेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालय, अधिविभागात प्रवेश दिला जाणार आहे. त्याअनुषंगाने विद्यार्थ्यांनी लसीकरण करून घ्यावे, असे आवाहन विद्यापीठाने केले आहे.

15 OCT 2021 पुढारी जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पर्यावरणीय बदलांचा शास्त्रीय अभ्यास आवश्यक : डॉ. पवार

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

पर्यावरणीय बदलांचा शास्त्रीय अभ्यास करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन पुण्याच्या डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलगुरू व शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. एन. जे. पवार यांनी केले.

विद्यापीठाच्या सेंटर फॉर क्लायमॅट चेंज अँड सस्टेनेबल स्टडीज यांच्या वतीने 'हवामान बदल व शाश्वत विकास' या ऑनलाईन व्याख्यानमालेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

डॉ. पवार म्हणाले, महापूर, भूकंप, वादळ आदी अंदाज वर्तवण्यायोग्य संकटांच्या बाबतीत हवामान तसेच पर्यावरणीय बदल मोठे चिंताजनक स्वरूपाचे आहेत. त्यामुळे त्यांच्याद्वारे निर्माण होणाऱ्या आपत्तींमध्ये झालेली वाढही चिंतेची आहे. पश्चिम महाराष्ट्राच्या विभागात पिण्याच्या पाण्यासह कृषी, सिंचन आणि उद्योग यासाठी लागणाऱ्या पाण्याची मागणी कशी कमी करता येईल, त्याचे योग्य नियोजन कसे करता येईल, या दृष्टीने विचार व अभ्यास करण्याचीही गरज आहे.

कुलगुरू डॉ. शिर्के यांनी पश्चिम महाराष्ट्रातील भौगोलिक व पर्यावरणीय स्थिती वेगळी आहे. या विभागात एकाच वेळी प्रचंड पर्जन्यमान असणारी आणि दुष्काळ सोसणारी गावे आहेत. या क्षेत्रातील तज्ज्ञांचे सहकार्य व मार्गदर्शन घेऊन संशोधनात पुढे जाण्याची विद्यापीठाची भूमिका असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी डॉ. पवार यांनी औपचारिक स्वरूपात शिवाजी विद्यापीठाच्या 'सेंटर फॉर क्लायमॅट चेंज अँड सस्टेनेबल स्टडीज'चे उद्घाटन झाल्याची घोषणा केली. ज्येष्ठ जलतज्ज्ञ नंदकुमार वडनेरे यांनी 'आधी केले, मग सांगितले' या उक्तीप्रमाणे विद्यापीठाने आधी या विषयातील तज्ज्ञांची व्याख्याने समाजाला सादर करून त्यानंतर केंद्राच्या स्थापनेची घोषणा केली, ही अभिनंदनीय बाब असल्याचे सांगितले. केंद्राचे संचालक डॉ. सचिन पन्हाळकर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आणि विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत प्रमुख उपस्थित होते.

लोकमत

# 'पदवी'च्या अंतिम वर्षांचे वर्ग पहिल्यांदा सुरू होणार

लोकमत न्यूज नेटवर्क,

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठ आणि संलग्नित महाविद्यालयांतील कला, वाणिज्य, विज्ञान विद्याशाखांच्या पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या अंतिम वर्षाचे वर्ग पहिल्यांदा सुरू करण्याचा विचार आहे. वर्ग ऑफलाईन पद्धतीने सुरू करण्याची मार्गदर्शक तत्त्वे विद्यापीठनियुक्त समिती निश्चित करणार असल्याचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी गुरुवारी सांगितले.

इयत्ता पाचवी ते बारावीपर्यंतचे वर्ग दि. ४ ऑक्टोबर रोजी सुरू झाले. आता महाविद्यालय, विद्यापीठातील वर्ग दि. २० ऑक्टोबरपासून सुरू करण्यास राज्य सरकारने परवानगी दिली आहे. पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे कोणते वर्ग सुरू करायचे. विद्यार्थिसंख्या किती असावी, याबाबतचा निर्णय घेण्याची मुभा विद्यापीठांना दिली आहे. या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठाच्या तयारीबाबत कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सांगितले की, विद्यापीठातील अधिविभाग आणि कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील संलग्नित महाविद्यालयांतील मार्गदर्शक तत्त्वे निश्चित करण्यासाठी स्वतंत्र समिती निश्चित केली आहे. या समितीकडून लवकरच मार्गदर्शक तत्त्वे जाहीर केली जातील. विद्यार्थ्यांचे लसीकरण करून पूर्ण क्षमतेने महाविद्यालये सुरू होतील. या लसीकरणाबाबत महाविद्यालयांना सूचना केल्या आहेत. विद्यार्थ्यांनी लस घेणे बंधनकारक असणार आहे.

## ऑनलाईन, ऑफलाईन व्यवस्था करणार

ज्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयात येणे शक्य नाही. त्यांना ऑनलाईन पद्धतीने शिक्षण द्यावे लागणार आहे. त्यामुळे महाविद्यालयांना एकाच वेळी ऑफलाइन आणि ऑनलाइन पर्यायाची व्यवस्था करावी लागणार आहे. अद्याप काही प्राध्यापक, कर्मचाऱ्यांचे लसीकरण पूर्ण झालेले नाही. त्यांचे लसीकरण करावे लागणार आहे. कोविड सेंटरसाठी दिलेल्या इमारती, वसतिगृहाचे निर्जंतुकीकरण, स्वच्छता महाविद्यालयांकडून सुरु झाली आहे.

### तीन वसतिगृहे ताब्यात

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठातील चार वसतिगृहे जिल्हा प्रशासनाने कोविड सेंटरसाठी ताब्यात घेतली होती. त्यांपैकी तीन वसतिगृहे विद्यापीठाच्या ताब्यात आली आहेत. उर्वरित एका वसतिगृहाची प्रक्रिया कोणत्या टप्प्यावर आहे, याची महिती घेतली जाईल, असे कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सांगितले.

सचिन पन्हाळकर : शिवाजी विद्यापीठात व्याख्यान

# पूर नियंत्रणासाठी 'कॅसकेड' धरणांची गरज

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : पंचगंगा खोऱ्यातील केवळ १२ टक्के क्षेत्र धरण पाणलोटाचे असून इतर भागातून येणाऱ्या पाण्यावर आपण नियंत्रण करू शकत नाही. त्यामुळे पूरस्थिती येते. ही समस्या दूर करण्यासाठी कॅसकेड धरणांची शृंखला निर्माण करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या 'सेंटर फॉर क्लायमेंट चेंज व सस्टेनेबिलिटी स्टडीज'चे समन्वयक डॉ. सचिन पन्हाळकर यांनी केले

या केंद्रामार्फत 'हवामान बदल व शाश्वत विकास' या ऑनलाईन व्याख्यानमालेतील सहावे पुष्प गुंफताना 'पंचगंगा महापूर: कारणे व उपाय' या विषयावर ते बोलत होते.

हवामान बदलाचा परिणाम म्हणू पंचगंगा खोऱ्यात साळवण इचलकरंजी या ठिकाणी सन २०१ मध्ये क्षमतेपेक्षा जास्त (अनुक्र १०४० मिमी, ८४ सेंमी) पावसाची नों झाल्यामुळे पूरस्थिती निर्माण झाल आहे. त्यामुळे पर्जन्याचे स्वरूप त्याची तीव्रता, कालावधी, प्रवणक्षे यांचा अभ्यास करणे महत्त्वपूर्ण आहे असेह ते म्हणाले .

## डायव्हर्जन चॅनलही परिणामकारक ठरेल

पंचगंगा खोऱ्यात आलेल्या सन २००५ आणि २०१९ च्या पुरांचे तुलनात्मक विश्लेषण केले असता, २०१९च्या पुराची तीव्रता अधिक असल्याचे अभ्यासाअंती स्पष्ट झाले. आलमट्टी धरणाचा पंचगंगा पुरावर फारसा परिणाम होत नसून, जास्त ग्रेडीएंटमुळे कृष्णा नदी पुराच्या वेळी पंचगंगेतील पाणी स्वीकारू शकत नाही. परिणामी, बॅकवॉटर इफेक्ट वाढून पूरपरिस्थिती उद्‌भवते. त्यासाठी त्यांनी डायव्हर्जन चॅनल हा उपाय असल्याचे सांगितले.

1 5 OCT 2021

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दोन लस घेतलेल्या विद्यार्थ्यांनाच महाविद्यालयात प्रवेश

प्रतिनिधी
कोल्हापूर

राज्यातील सर्व विद्यापीठ अंतर्गत महाविद्यालये २० ऑक्टोबरपासून सुरू होणार आहेत. या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठानेही तयारी सुरू केली आहे. महाविद्यालये सुरू करण्यासंदर्भातील तयारीबाबत सर्व अधिकार मंडळाबरोबर चर्चा करून निर्णय घेतला जाईल. दोन लस घेतलेल्या विद्यार्थ्यांनाच महाविद्यालयात प्रवेश दिला जाणार आहे, अशी माहिती कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी दिली आहे.

विद्यापीठ अंतर्गत महाविद्यालय सुरू करण्यासंदर्भातील शासन परिपत्रकानुसार पन्नास टक्के विद्यार्थ्यांनाच वर्गात बोलवले जाणार आहे. कोणते वर्ग अगोदर चालू करायचे, यासंदर्भात एक समिती नेमली जाणार आहे. तसेच महाविद्यालय व विद्यापीठाच्या कॅम्पसमध्ये वर्ग सुरू करण्यासंदर्भात नियोजन केले जाईल. विद्यार्थ्यांची गैरसोय होणार नाही याची काळजी विद्यापीठ प्रशासनाकडून घेतली जाईल. सध्या भरपूर प्रमाणात लस उपलब्ध आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आतापासूनच लस घेण्याकडे लक्ष द्यायला पाहिजे. तसेच विद्यार्थी हित लक्षात घेऊन महाविद्यालय ,संस्था आणि विद्यापीठ पातळीवर राज्य शासनाच्या संबंधीत यंत्रणेने लस उपलब्ध करून द्यावी. जेणेकरून विद्यार्थ्यांचा पुढील मार्ग सोयीचा होईल, असे आवाहनही राज्य शासनाला कुलगुरू डी. टी. शिर्के यांनी केले आहे.



■ शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची माहिती

**अधिविभाग, महाविद्यालये सज्ज**

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत कोल्हापूर, सांगली, सातारा तिन्ही जिल्ह्यातील महाविद्यालये सुरू करण्यासंदर्भात कोणतीही अडचण नाही. विद्यापीठ अंतर्गत सर्व महाविद्यालये, अधिविभागांची स्वच्छता, सॅनिटायझेशन झालेले आहे. शासन आदेशाचे पालन करीत अधिविभाग व महाविद्यालये २० ऑक्टोबरपासून सुरू केली जाणार आहेत. विद्यापीठ प्रशासन,महाविद्यालय स्तरावर याबाबत काळजी घेतली आहे.